जा.क्र.प्रा/प्राशि/मान्यता/पीआर,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे. १. यांचे कार्यालय,
दिनांक :- २९ ऑक्टोंबर, १९८४.

15 NOV 1984

प्रति

मा. सचिव,
दि. ट्रिनिटी स्कूल, दिघी कँप,
पुणे. ४११ ०१५.

विषय : दि ट्रिनिटी इंग्लिश स्कूल, दिघी, पुणे.
प्राथ. शाळेस परवानगी मिळणेबाबत.

Primary recognition non-aided Permission

संदर्भ : शासनाकडील जा.क्र. व्हिएलएस-१०८१/५३२४३/[९१०]/
प्राशि-३, दिनांक १५.१०.१९८३ चे पत्र.

महाशय,

उपरोक्त विषयासंबंधीच्या शासनाकडील संदर्भित पत्रानुसार ख्रिश्चन सर्व्हिस सेंटर सोसायटी या संस्थेने दिघी कँप, पुणे येथे दि ट्रिनिटी इंग्लिश मिडीयम स्कूल या नावाने सुरु केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेस घातलेली बंदीची अट अंशत: शिथिल करून अपवादात्मक परिस्थितीत "खास बाब" म्हणून कायम विना अनुदान तत्वावर खालील अटींच्या आधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१] नियमानुसार संस्था रजिस्टर असली पाहिजे.
२] संस्थेने ही प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्याची व भविष्य काळांत कधीही शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही, अशी लेखी संमती दिली पाहिजे.
३] संस्थेने शाळेचा एकूण शिक्षक वर्ग विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित [एस्. एस्. सी. डी. एड्. ] नेमलाच पाहिजे व त्यांना शासनाने ठरवून दिलेले वेतन व भत्ते दिले पाहिजेत.
४] संस्थेने शाळेसाठी स्वतंत्र व आधुनिक शैक्षणिक साहित्याने परिपूर्ण अशी स्वत:ची इमारत उपलब्ध केली पाहिजे.
५] शाळेतील प्रत्येक वर्गामध्ये शासनाने ठरवून दिलेली विद्यार्थी पटसंख्या व हजर संख्या असली पाहिजे.
६] संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणताही दुष्परिणाम होणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे.
७] शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे संस्थेने पालन केलेच पाहिजे.
८] शाळेच्या फी चे दर शासनाने विहित केल्यानुसार असले पाहिजेत. त्यापेक्षा जादा फी घेता कामा नये.
९] मुंबई प्राथ. शिक्षण नियमावली, १९४५ मधील विहित अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.
१०] नियमानुसार अनुसूचित जाती/जमातीच्या शिक्षकाचे प्रमाण भरलेच पाहिजे.

आपला विश्वासू,

[signature]

मूळ प्रतीवर शिक्षण उप संचालक
यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे. १.

गेडाम/*

प्रत शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे. ११. यांना माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी.

२/- या बाबत त्यांना कळविण्यांत येते की, सदरचे शाळेची तपासणी करून, विहीत अटींची पूर्तता झाल्याची खात्री करून घेऊन अहवाल या कार्यालयास उलट टपाली पाठवावा./